## प्रकरण१०: व्याख्या(या पुस्तिकेत वापरलेल्या विशेष शब्दांची यादी)

१ *विविध प्रकारचे भाव (चेहऱ्याचे):* चेहऱ्यावरच्या हावभावाप्रमाणे. चेहऱ्याच्या हालचाली आणि स्थिती मधून वेगवेगळ्या भावना दर्शवणे. उदा. हसणे, आठ्या पाडणे, भुवया उंचावून आश्चर्य दाखवणे ,डोळेतिरके करून राग किंवा नाराजी दाखवणे.

२ *दमा / ठसका लागणे :* जेव्हा अन्नपदार्थ अन्ननलिकेत न जाता श्वासनलिकेतून फुफ्फुसात जाते तेव्हा जोरात खोकला येतो तो ठसका. यामुळे आजारी पडणे, कुपोषण होणे आणि क्वचित प्रसंगी मृत्यू होऊ शकतो.

३ *तिरळेपणा:* डोळ्यातील दोष/यामुळे व्यक्तीला वस्तू विपर्यस्त आणि चुकीच्या दिसतात.

४ *स्तन कडक होणे:* जेव्हा एक किंवा दोन्ही स्तनात जास्त दूध निर्मिती होते तेव्हा ते सुजून कडक बनतात आणि वेदना होतात.

५ *पोटदुखी:* बाळाला असह्य पोटदुखी होते आणि ते कशानेही शांत होत नाही. ० ते ३ महिन्यांच्या मुलांमध्ये हे जास्त आढळते आणि त्याचे कारण समजू शकत नाही.

६ *घटाघटा पिणे:* पेयाचे घोट एकामागून एक न थांबता घेणे आणि गिळणे.

७ *सामुहिक शिस्त:* आपण इतरांशी साधलेला संवाद. मुले आणि बालकांनी इतरांबरोबर शिस्तीत वागायला शिकून (इतरांशी चांगले वागून) स्वयंशिस्त शिकणे.

८ *दृष्टी दोष (CVI):* मेंदूतील दोषामुळे व्यक्तीला दिसू शकत नाही. याचा अर्थ असा नाही की व्यक्ती अंध आहे पण तिच्या दृष्टीत दोष असतो आणि ती नीट बघू शकत नाही. व्यक्तीनुसार हा दोष वेगवेगळा असू शकतो.

९ *इशारे:* शिशु आणि बालके त्यांच्या गरजा आणि इच्छा संगोपकाला सांगण्यासाठी आवाज, शारीरिक हालचाली, चेहऱ्यावरचे हावभाव यांचा वापर करतात. ती जेवायला तयार आहेत, बोलण्याची मजा घेतायत, पोट भरले आहे किंवा विश्रांती हवीय हे सांगायला मुलं असे इशारे करतात.

१० *रोजची काळजी:* मुलाच्या जेवण आणि पाणी या प्राथमिक गरजा तसंच रोजच्या आंघोळ करणे, कपडे बदलणे, शु शी बघणे अशा दिनचर्येत मदत करणे म्हणजे रोजची काळजी.

११ *संवेदना कमी करणे:* अतिसंवेदनशील मुलांना कमी संवेदनशील करण्यासाठी आणि एखाद्या गोष्टीला योग्य प्रतिसाद देण्यासाठी तयार करायला संगोपाकाला विशेष प्रयत्न करावे लागतात. उदा, जर एखादा मुलगा चेहऱ्याला हात लावू देत नसेल तर हळूहळू संगोपक त्याला या स्पर्शासाठी तयार करते.

१२ *विकासाला विलंब/ अक्षमता :* ० ते ८ वर्षापर्यंतच्या मुलांमध्ये कधी कधी विकासाच्या एका किंवा अनेक क्षेत्रामध्ये विकासाची गती अपेक्षेपेक्षा कमी झालेली दिसते.

१३ *आहाराची प्रगती:* संगोपक बाळाला नवीन पदार्थ खातापिताना मदत करते.

१४ *नाकारण्याचे इशारे:* मुलाने पोट भरल्याचे किंवा जास्त उत्तेजित झाल्याचे आणि जेवताना विश्रांतीची गरज असल्याचे इशारे देणे.

१५ *चोखण्यात अनियमितता:* पिताना मुलाच्या चोखण्यात अनियमितता असणे, लय नसणे.

१६ *स्वीकाराचे इशारे :* भूक लागल्याचे, पदार्थ आवडल्याचे आणि बोलण्याची मजा येत असल्याचे इशारे मुले दाखवतात.

१७ *फुफ्फुसाची झडप :* श्वासनलिकेचा आणि फुफ्फुसाकडे जाण्याचा मार्ग बंद करणारा उतींचा एक तुकडा. या झडपेमुळे अन्न आणि पेय फुफ्फुसात जाण्याला विरोध होतो.

१८ *अन्ननलिका:* अन्न आणि पेय घश्यातून पोटाकडे नेणारी स्नायूंची नलिका

१९ *फक्त स्तनपान:* मुलाला पाणी, इतर पेय आणि फॉर्म्युला दूध असे काहीही न देता फक्त आईचे दूध दिले जाते. पहिल्या सहा महिन्यात बाळाला फक्त स्तनपान देण्याचा तीव्र आग्रह असतो.

२० *तोंडाला मालिश करण्याचे तंत्र:* आहारासाठी बाळाच्या तोंडाचे स्नायू वाढीसाठी तयार व्हावे म्हणून तोंडाला मालिश करतात. जेवायच्या आधी केले तर बाळाचे स्नायू खाण्यापिण्यासाठी तयार होतात.

२१ *वाढीची प्रगती खुंटते:* मूल वयानुसार अपेक्षेप्रमाणे वादात नाही. या मुलांना जास्तीचे पोषण हवे असते. त्यांना अधिक आहार, उच्च पोषण मूल्य असलेले पदार्थ आणि पेय नळीतून देऊन त्यांच्या वाढीला साहाय्य करता येते.
२२ *गोंधळ उडणे:* जेव्हा मूल वैतागते तेव्हाते रडून गोंधळ घालते आणि त्याला शांत करणे कठीण असते.
२३ *तोंडाचा आ करणे:* बाळ दूध पिण्यासाठी तोंड उघडून त्याचा मोठा आ करते आणि स्तनाला तोंडात घेऊन चोखू लागते.
२४ *अन्ननलिकेची प्रतिक्षिप्त क्रिया (GER):* पोटातील अन्न घश्यात येऊन वेदना अस्वस्थता येते. उलटी होते.
२५ *उलटी होण्याचा आजार (GERD):* वारंवार उलटी होऊन मुलाला अन्न नीट जात नाही आणि त्याचे वजन वाढत नाही. मूल सारखे थुंकते आणि अस्वस्थ असते. भूक लागते पण खाता येत नाही म्हणून नाराज होते.
२६ *गटकन गिळणे:* मोठा घास किंवा घोट घेऊन तो पटकन गिळणे किंवा एकापुढे एक घास किंवा घोट न थांबता घेणे.
२७ *अतिप्रतिसाद :* एखाद्या गोष्टीला अपेक्षेपेक्षा तीव्र प्रतिसाद देणे
२८ *स्नायूंची ताकद जास्त (High Tone):* कडक आणि टणक स्नायू.
२९ *अतिसंवेदनशीलता:* एखाद्या गोष्टीला अपेक्षेपेक्षा तीव्र प्रतिक्रिया देणे.
३० *स्नायूंची ताकद कमी (Low Tone):* ठिसूळ, अशक्त स्नायू.
३१ *कमी प्रतिसाद:* एखाद्या गोष्टीला अपेक्षेपेक्षा कमी, मंद प्रतिसाद देणे.
३२ कमी संवेदनशीलता : एखाद्या गोष्टीला अपेक्षेपेक्षा कमी, मंद प्रतिक्रिया देणे.
३३ *चोखणे/लुचणे :* बाळ दूध पिताना स्तनाशी तोंड लावून चोखत राहते. बाळ जेव्हा स्तनाग्राभोवतीचा संपूर्ण भाग तोंडात खोलवर घेऊन चोखते ती योग्य स्थिती असते.
३४ *ओठांना उत्तेजन:* पिण्यासाठी बाळाला प्रेरणा मिळावी म्हणून संगोपक त्याच्या ओठांना स्तनाग्राचा किंवा बाटलीच्या बुचाचा स्पर्श करणे.
३५ *खेळणी:* वयानुसार बाळाला शांत करण्यासाठी वापरले जाणारी विशिष्ट चादर , बाहुली किंवा खेळणं.
३६ *वैद्यकीय दृष्ट्या नाजूक तब्येत:* एखाद्या मुलाला आजारपणामुळे वैद्यकीय मदतीची जास्त गरज असते. तब्येत खालावू नये आणि आरोग्य नीट राहावे म्हणून त्यांना अधिक देखभालीची गरज असते
३७ *स्नायूंचे नियोजन:* एखादी कृती सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्नायूंचा योग्य वापर करून नीट पार पाडणे. उदा, एखाद्या मुलाला पाणी प्यायचे आहे. तो हात पुढे करून पाण्याचा कप हातात घेतो, तोंडाकडे आणून ओठांना लावतो, घोट घेऊन गिळतो. जेव्हा स्नायूंच्या काही समस्या असतात तेव्हा या पायऱ्या करणे कठीण जाते. काम अपुरे आणि चुकीचे होते.
३८ *वस्तू तोंडात घालणे:* बाळ प्रत्येक वस्तू तोंडात घालून पाहते. मेंदूच्या आणि वाढीच्या विकासाच्या टप्प्यातील हे एक चांगले लक्षण आहे आणि यामुळे खाण्याच्या आणि बोलण्याच्या क्षमता वाढीला फायदा होतो.
३९ *मेंदूच्या विकासात अडथळे:* मेंदूतील संदेश पोचवणाऱ्या मज्जारज्जूतील दोषामुळे काही अपंगत्व किंवा अक्षमता निर्माण होतात. यामुळे वाढीमध्ये अडचणी येतात आणि तिचा वेग मंदावतो.
उदा, स्वमग्नता, सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक अपंगत्व, एकाग्रतेचा अभाव, अतिचंचलता आणि दृष्टी तसंच श्रवण दोष.
४० *मेंदूच्या स्नायूंच्या समस्या:* काही वैद्यकीय कारणांमुळे स्नायूंच्या वाढीवर आणि कार्यावर परिणाम होतो.
४१ *चेतापेशी:*मज्जसंस्था तयार करणाऱ्या पेशी
४२ *अपोषक स्तनपान:* बाळ पोषणाव्यतिरिक्त फक्त आरामासाठी किंवा आनंदासाठी स्तनपान करते.
४३ *पोषक स्तनपान (NS):* बाळ पोषणासाठी स्तनपान करते.
४४ *योग्य काळजी /निगा:* मुलाच्या रोजच्या गरजा भागवताना त्याच्याशी प्रेमळ आणि सकारात्मक नाते ठेवणे.

४५ *तोंडाच्या स्नायूंची क्षमता:* तोंडाच्या गाल, ओठ, जीभ आणि जबड्यासह हालचाली. यामध्ये आहार आणि बोलण्यासाठी शक्ती, हालचालीचा समन्वय आणि नियंत्रण गरजेचे असते.

४६ *चोखण्यातील नियमितता:* बाळ एका लयीत नियोजनपूर्ण दूध चोखते किंवा पिते.

४७ *ऑर्थोडोंटिक बूच:* स्तनाग्राला जवळचा पर्याय म्हणून तोंडात चपखल बसणारे बाटलीचे बूच किंवा चोखणी

४८ *अति उत्तेजना:* एखाद्या गोष्टीला अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिक्रिया देणे. उदा. एखाद्या भरपूर आवाज आणि गर्दी आणि हालचाल असलेल्या जागेत मूल नाराज होऊन रडू लागते.

४९ *वेग:* बाळाच्या आहाराचा वेग . बाटलीने दूध पिताना मध्ये मध्ये थोडी विश्रांती देणे. मोठ्या मुलांना बाळाला झेपेल अशा वेगात घास किंवा घोट देणे

५० *घसा:* घसा .

५१ *स्वस्थता:* आहार आणि संवाद यासाठी अत्यावश्यक अशी शांत राहण्याची क्षमता.

५२ *मान टाकणे:* बाळाच्या गालाला आणि ओठाला हात लावला तर ते मान बाजूला वळवते.

५३ *रवंथ/ चघळणे :* वेगवेगळे पदार्थ चावून गोलाकार हलवत चघळत राहणे

५४ *स्वतः हाताने जेवणे:* हात, बोटे, भांडी चमचे कप वापरून स्वतः हाताने खाणे. ताटली वाटी किंवा कपातून अन्न आणि पेय तोंडाकडे आणून खाणे.

५५ *स्वतःचे नियमन:* एखाद्या प्रसंगी शांत राहणे किंवा इतरांशी शांततेत जुळवून घेणे.

५६ *कांगारू प्रेम :* जेव्हा बाळाचे आई किंवा बाबा त्याला स्वतःच्या उघड्या छातीशी कवटाळून धरतात त्याला कांगारू प्रेम असे म्हणतात.

५७ *टाळू:*तोंडातील वरच्या बाजूचा मागचा भाग .

५८ *विशिष्ट बाटल्या:*दुभंगलेले ओठ आणि टाळू असलेल्या तसंच लवकर जन्माला आलेल्या मुलांसाठी विशिष्ट आकाराच्या बाटल्या.

५९ *जबड्याचे हाड::* चेहऱ्याच्या बाजूला कानाच्या खाली वरच्या जबड्याजवळ असलेले खालचा जबडा कवटीला जोडणारे हाड. खाणेपिणे आणि बोलण्यासाठी या हाडाची हालचाल गरजेची असते.

६० *दाटपणा आणणारे पदार्थ:* पदार्थांचा आणि पेयाचा दाटपणा बदलणारे घटक

६१ *श्वास नलिका:* नाकातून हवा फुफ्फुसाकडे वाहून नेणारी नलिका.

६२ *कमी उत्तेजना:* एखाद्या गोष्टीला अपेक्षेपेक्षा अजिबात प्रतिक्रिया न देणे किंवा कमी प्रतिक्रिया देणे. उदा. वेदनेची लक्षणे न दाखवता मूल टेबलावर डोके आपटते . मुलाला जाणिवांचे अनुभव खूप कमी मिळतात तेव्हा त्याची प्रतिक्रिया कमी असते कारण त्याला कमी उत्तेजन मिळते. आणि त्यामुळे त्याच्या वाढीचा वेग मंदावतो.